भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. १२८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/०२/२०१७

**१) सार्वजनीक ठिकाणी वाहन उभे ठेवुन रहदारीस अडथडा निर्माण झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २०/०२/२०१७ चे १६.१५ ते १७.०० वा. दरम्यान. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील आटो रिक्षा क्र. एमएच ३१/२२१६ चा चालाकने आपल्या ताब्यातील वाहन आम रोड वर उभे करुन वाहतुकीस, जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना अडथळा निर्माण होईल असे उभे करुन ठेवल्याने पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. ढोक पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**२) दारूडया वाहन चालकावर कारवाई:—**

दिनांक २०/०२/२०१७ चे १८.१० ते १८.३० वा. दरम्यान यातील आरोपी हा आपल्या ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३१ ई ८०२२ चा चालक हा दारु पिऊन दारुचे नशेत मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल अनॉलायझर मशीन व्दारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. शेख वानीशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे कारधा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुटकुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) विषारी औषध प्राशन केल्याने इसमाचा मृत्यु . :—**

दिंनाक १९/०२/२०१७ चे २०.३५ वा. दरम्यान यातील मृतक दिनेश हरीशंकर फटे वय २६ वर्ष, रा. लोहारा हा आपले शेतावर कामाने गेला होता की, त्याने शेतामध्ये थायमेंट विषारी औषध प्राशन केल्याने त्याचे घरा शेजारील सुधाकर काटेकर यांनी मृतकचे वडीलाला फोन करुन सांगीतले की, तुझ्या मुलाने विषारी औषध खाललेली आहे. असे सांगीतल्या वरुन त्याचे वडीलांनी त्यास औषधोपचारा करीता ग्रामीण रुग्णालय पालांदुर येथे उपचार करीता घेवुन गेले नंतर पुढील उपचारा करीता सारु भंडारा येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी चेक केले असता मरण पावल्याचे घोषीत केल्याने डॉक्टरी ममो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र पोस्टे पालांदुर येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे सफौ. गभणे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोले पो. स्टे. पालांदुर हे करीत आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.